# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.०१/फ-१०

**E-mail: deskf10.rfd-mh@gov.in**

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २०.०५.२०२२

**प्रति,**

वनसंरक्षक (प्रा.), धुळे
उपवनसंरक्षक, नंदूरबार

**विषय: वनजमीन-नंदूरबार**
वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कारेघाट लघुसिंचन तलावासाठी कारेघाट, ता. नवापूर, जि. नंदूरबार येथील ७३.९४ हे. वनक्षेत्र वळतेकरणाबाबत

**संदर्भ:** केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/धुळे/आय. डी. - १२९४२(२५)/३०४/२०२२-२३, दि.०६.०५.२०२२

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कन्झर्वेशन रिझर्व्हचे क्षेत्र वगळून कारेघाट लघु सिंचन तलावासाठी ७३.९४ हे. वनजमीन प्रस्तावित केली असल्याचे व त्यामुळे सदर कन्झर्वेशन रिझर्व्हचे क्षेत्र कमी होणार नसल्याचे कळविले आहे. मात्र, वनसंरक्षक- धुळे यांच्या मूळ प्रस्तावात जोडलेल्या स्थळ पाहणी अहवालात प्रस्तावित प्रकल्प हा कन्झर्वेशन रिझर्व्हचा भाग असल्याचे नमूद केले होते. सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावयाचा असल्याने त्यानुषंगाने या विसंगतीबाबतचा खुलासा करून वनसंरक्षक- धुळे यांचा सुधारित स्थळ पाहणी अहवाल शासनास त्वरित सादर करावा.

**(गणेश जाधव)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर